## भूसंपादन निर्देशन अर्ज क्र. ४१/२०१८ मधील नि. ५३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज क्लेमंट क्र.३ मोहीददीन अब्दुल रहेमान ठाकूर यांचतर्फे रक्कम मिळणेकरीता सादर केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील रेफरी तर्फे सादरलेखी म्हणणे तसेच क्लेमंट क्र .२ चे वारसांतर्फे सादर केलेले लेखी म्हणणे याचे अवलोकन केले.

०३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०४. क्लेमंट तर्फे अर्जात असे कथन करण्यात आले की, प्रस्तुत भूसंपादन अर्जाच्या अनुशंगाने सर्वे न. ३१/३८+३९+ ४२ तसेच सर्वे नं.९/३ पैकी, सर्वे नं.७/२२ पैकी तसेच सर्वे नं.१०/२+३ व सर्वे नं.११/१५ या जमीनीच्या संपादनाच्या अनुशंगाने नोटीस नं .१०४ प्रमाणे एकूण रक्कम रुपये ४७,८९,२७८/– व त्यावरील व्याजासह अर्जदार यांना दिली जावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. अर्जदार यास नोटीस क्र.१०४ अन्वये प्राप्त रक्कमेसंदर्भात कोणाचाही वाद नाही असे कथन अर्जदार तर्फे करण्यात आली.

०५. क्लेमंट क्र.२ च्य वारसांतर्फे न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केली. परंतू जिल्हा सरकरी वकील यांनी अर्जाला हरकत घेतली व असे कथन केले की , सदर अर्जाबाबत इतर क्लेमंट यांनी नोटरी यांचेकडील मुखत्यारपत्र दिलेले दिसून येते परंतू इतर कोणताही कागदपत्र या अर्जासोबत दिसून येत नाही त्यामुळे अर्जाचे सत्यतेबाबत शंका निर्माण होते तरी अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती जिल्हा सरकारी वकीलामार्फत करण्यात आली.

०६. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत भूसंपादन निर्देशन अर्ज हा मुख्यत्वे हरकतदार म्हणजेच क्लेमंट माधव शंकर ढेकणे यांनी घेतलेल्या हरकतीच्या अनुशंगाने न्यायालयाकडे पाठविण्यात आला होता. हरकतदार माधव ढेकणे यांनी नि. ४९ वर इतर नोटीसधारकांना मान्य झालेल्या रक्कमेबाबत त्यांची कोणतीही हरकत नसल्याबाबत कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी फक्त विवरण पत्रानुसार नोटीस १०४ प्रमाणे त्यांना देय असलेल्या रक्कमेचीच मागणी प्रस्तुत अर्जात केलेली आहे. अभिलेखावर त्यांना देय असलेल्या रक्कमेबाबत त्यांना कोणतीही हरकत दिसून येत नाही . मुखत्यारपत्राच्या अनुशंगाने जिल्हा

सरकारी वकील यांनी हरकत घेतलेली आहे . परंतू अर्जानुसार अर्जदार हा त्याची स्वतःच्याच रक्कमेची मागणी करीत आहे व मुखत्यारपत्राच्या आधारावर इतर लोकांना देय असलेला मोबदला प्रस्तुत अर्जात अर्जदार यांनी मागीतलेला नाही. त्यामुळे जिल्हा सरकारी वकील यांना घेतलेली हरकत विचारात घेता येणार नाही. सबब अर्ज मंजूर होण्यासा पात्र आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. अर्जदार मोहददीन अब्दुल रहेमान ठाकूर यांना देय असलेली रक्कम रुपये ४७,८९,२७८/– ही त्यांना सदर रक्कमेच्या अनुशंगाने मुदत ठेव खात्यात ठेवण्यात आल्यानंतर त्यावर नियमानुसार प्राप्त होणा–या व्याजासह देण्यात यावी.

०३. सहाय्यक अधिक्षक यांनी वरील आदेशाप्रमाणे पडताळणी करुन अर्जदार यांना रक्कम देणेसंदर्भात पुर्तता करावी.

TIDKE AMARDEEP DADARAO
Digitally signed by TIDKE AMARDEEP DADARAO
Date: 2024.10.22 18:06:54 +0530

ओरोस
दिनांक – १८/१०/२०२४

**(अ.डी.तिडके)**
सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर),
सिंधुदुर्ग–ओरोस.